# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**

एम.एस.सी., पी.एच.डी.

संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ


संदर्भ क्र. विकमं/२०१३–१४/९८३ दिनांक : ०५/०६/२०१३

प्रति,

**मा. प्राचार्य / मा. संचालक**

संलग्न महाविद्यालये /मान्यताप्राप्त संस्था.

**विषय : रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबत....**

महोदय/महोदया,

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंगच्या प्रकारांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने **महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम, १९९९** लागू केला आहे. भविष्यात रॅगिंगच्या घटना घडू नयेत याकरिता व्यापकस्वरूपात जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालयांनी, मान्यताप्राप्त संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर अधिनियमांची माहिती करून विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंगचे प्रकार प्रतिबंधित करण्याच्या दृष्टीने विस्तृतस्वरूपात जागृती करावी.

१) रॅगिंगविरोधी चळवळ आपल्या महाविद्यालय व संस्थांमधून सुरू करावी. महाविद्यालयाचे माहितीपत्रक व प्रवेशासंबंधीच्या तत्सम प्रकाशनांद्वारे रॅगिंग विषयीच्या शिक्षेबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत. रॅगिंगमध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यास त्याची बाजू मांडण्याची संधी दयावी. त्याचे म्हणणे असमाधानकारक वाटल्यास त्यास महाविद्यालयातून निलंबित करावे. अशाप्रकारे शिक्षा झालेल्या विद्यार्थ्यांची नावे महाविद्यालयाच्या माहितीपत्रकात नमूद करावीत.

शैक्षणिक संस्थेकडून प्रवेशासाठी छापलेल्या पुस्तिकेमध्ये (prospectus) असे स्पष्टपणे नमूद करावे की, प्रवेशासाठी येणारा विद्यार्थी यापूर्वी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला असेल तर त्याला प्रवेश नाकारण्यात येईल किंवा प्रवेश दिल्यानंतरही असे निदर्शनास आले की, सदर विद्यार्थी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला होता तर त्याला निष्काशित करण्यात येईल.

२) आपल्या महाविद्यालय व संस्थेत रॅगिंग प्रतिबंध समित्या आणि पथके तातडीने स्थापन करावीत. रॅगिंगविरोधी समिती आणि पथक महाविद्यालयात नियुक्त करून त्या सर्व सदस्यांची नावे, पत्ते व दूरध्वनी क्रमांक प्रसिध्द करावेत.

आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्थेत 'अँन्टि रॅगिंग कमिटी' व ' अँन्टि रॅगिंग स्क्वॉड' नियुक्त करावे. अँन्टि रॅगिंग कमिटीमध्ये स्थानिक नागरिक, पोलिस प्रशासन, प्रसार माध्यमे, अशासकीस स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींबरोबरच महाविद्यालयीन शिक्षक, पालक, शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थ्यांचाही प्रतिनिधीत्व असावे. या समितीचे प्रमुख प्राचार्य/संचालक असावेत. अँन्टि रॅगिंग स्क्वॉड हे पर्यवेक्षणाच्या कामात सर्तक असेल व यामध्ये बाहेरील व्यक्तिंचा समावेश असणार नाही.

३) समुपदेशन वर्ग व ओरीएन्टेशन कोर्सेसद्वारे नविन आलेल्या व वरिष्ठ विद्यार्थ्यांचे प्रबोधन करावे. सर्व महाविद्यालये/शिक्षण संस्थांनी प्रवेशाचे वेळी तज्ञ/व्यावसायिक समुपदेशकामार्फत नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करावे.

...२...

४) रॅगिंगमध्ये दोषी आढळलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षा देऊन झालेल्या शिक्षेबाबत व्यापक प्रसिध्दी द्यावी.
उदा :— अ) स्कॉलरशिप व तत्सम आर्थिक लाभ देण्याचे थांबवणे.
ब) महाविद्यालयातून निलंबित करणे
क) निकाल थांबविणे.
ड) वसतिगृहातून निलंबित करणे, इत्यादी.

५) महाविद्यालय सुरू होताना दृकश्राव्य माध्यमाच्या मदतीने रॅगिंग प्रतिबंधाबाबत विद्यार्थ्यांचे प्रबोधन करणे.

६) विद्यार्थी संघटनांमध्ये रॅगिंगच्या वाईट परिणामांची व तत्संबधी होणाऱ्या शिक्षेबाबतची जाणीव व जागृती करावी.

७) विद्यार्थी व पालक यांचेकडून रॅगिंगमध्ये सहभाग होणार नाही अथवा त्याचे समर्थन करणार नाही अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र घ्यावे.

८) महाविद्यालयात व मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनींकडून रॅगिंग संदर्भातील हमीपत्र घेताना मा. सर्वोच्च न्यायालय, विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाकडून देण्यात आलेल्या निर्देशांचे पालन करावे.

९) वसतिगृहातील प्रवेश अत्यंत काळतीपूर्वक द्यावेत. वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वतंत्र समुपदेशन आयोजित करण्यासाठी वसतिगृह प्रमुखांनी पुढाकार घ्यावा.

१०) ज्या महाविद्यालयात / मान्यताप्राप्त संस्थेत रॅगिंगच्या घटना वारंवार घडल्याच्या नोंदी होतील व जी महाविद्यालये याबाबत उपाययोजना करणार नाहीत त्यांचे यु.जी.सी. व अन्य संस्थाकडून मिळणारे अनुदान थांबविण्यात येईल.

संबंधित संस्थेचे प्राधिकारी आणि कार्यकर्ते यांची रॅगिंगला प्रतिबंध करण्याची सामुदायिक जबाबदारी राहील. शैक्षणिक संस्थेने रॅगिंगला प्रतिबंध करण्यासाठी परिणामकारक उपाययोजना केली किंवा नाही याची शासनाला तपासणी करता येईल आणि जर यामध्ये त्यांनी योग्य ती कार्यवाही केली नसेल तर राज्य शासनाकडून अनुदान नाकारण्यासारखी कारवाई केली जाऊ शकेल.

११) रॅगिंगला प्रतिबंध करण्यासाठी महाविद्यालयात तत्संबंधीचा आशय असलेले बॅनर, बिल बोर्ड अथवा होर्डिंगस् महाविद्यालयात लावावेत.

१२) मा. सर्वोच्च न्यायालयाने सुचविलेल्या रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबतच्या वरील शिफारशी व विद्यापीठ अनुदान आयोगाने यासंदर्भात प्रसिध्द केलेल्या नियमांची अंमलबजावणी करणे सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था व शिक्षण संस्थांना बंधनकारक असेल.

सदर नियमवलीच्या पुस्तिकेची प्रत या विभागाद्वारे यापूर्वीच सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांना पाठविण्यात आली आहे त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

**वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर कार्यवाहीचा अहवाल व विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या सोबतच्या तक्यात नमूद केलेली माहिती सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांनी दर सहा महिन्यांनी (प्रथम व द्वितीय सत्रामध्ये) मा. संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे — ४११ ००७ या कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे, ही विनंती.**

कळावे,

सोबत: विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेला तक्ता.

5/6/13

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

## UNIVERSITY GRANTS COMMISSION

Proforma for monitoring the directions of Hon'ble Supreme Court of India on measures against Ragging in educational institutions.

| Sr. No. | Name of the institution, city | | |
|---|---|---|---|
| | Action | | |
| 1 | Whether Anti ragging Squads were Constituted? | Yes/No | |
| 2 | Whether Anti ragging Committees were Constituted? | Yes/No | |
| 3 | Whether prospectus mention possible actions against Ragging? | Give brief details | |
| 4 | Whether names, telephone nos. of authorities to be contacted have been publicized/made available to Freshers | -Do- | |
| 5 | Whether students are allowed free access to phone (Cell & Landline) in hostel(s) for timely reporting | -Do- | |
| 6 | Whether Seniors counseled | -Do- | |
| 7 | Whether Freshers counseled | -Do- | |
| 8 | Whether orientation courses for Freshers conducted | -Do- | |
| 9 | Anti Ragging Squads | 9(a) Date of formation<br>9(b) No. of members<br>9(c) No. of raids<br>9(d) Frequency of raids<br>9(e)Surprise raids<br>9(f)Others measures taken by the squad<br>9(g)No. of cases detected<br>9(h)Action taken as follow up. | |
| 10 | AntiRagging Committee. | 10(a) Date of formation<br>10(b) No. of members<br>10(c) No. of raids<br>10(d) Frequency of raids<br>10(e)Surprise raids<br>10(f)Others measures taken by the squad<br>10(g)No. of cases detected<br>10(h)Action taken as follow up. | |
| 11 | Inquiry(ies) Conducted | | |
| 12 | Punishment meted out. | 12(a) Suspension<br>12(b)Rustication<br>12(c) Expulsion | |
| 13 | No.of F.I.R.(s) lodged by Institution with deatils | | |